RNI No. MAHBIL/2009/35529

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ८, अंक ५०] गुरुवार ते बुधवार, डिसेंबर १५-२१, २०२२/अग्रहायण २४-३०, शके १९४४ [पृष्ठे १५ किंमत रुपये : १४.००

## प्राधिकृत प्रकाशन

### शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

**पोलीस उप-आयुक्तालय, मुख्यालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक पोउपआ-मिभाववि/मुख्या./वाहतूक अधिसूचना/७०७/२०२२.—ज्याअर्थी, वसई-विरार महानगरपालिका व वसई तालुका कला क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्तरावर वसई-विरार महानगरपालिका मॅरेथॉन स्पर्धा व इतर शालेय स्पर्धांचे आयोजन रविवार, दिनांक ११ डिसेंबर २०२२ रोजी नवीन विवा कॉलेज येथे करण्यात आले असून पूर्ण मॅरेथॉन (४२.१९५ कि.मी.) स्पर्धेचे आयोजन नवीन विवा कॉलेज, विरार (पश्चिम) येथे, अर्ध मॅरेथॉन (२१.०९५ कि.मी.) स्पर्धेचे आयोजन व्हिक्टर हाईटस् बिल्डींग, वसई (पश्चिम) येथे, ११ कि.मी. मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन नवीन विवा कॉलेज, विरार पश्चिम येथून आयोजित करण्यात आलेले असून या तीनही मुख्य स्पर्धांचा व इतर स्पर्धांचा फिनीश पॉईंट नवीन विवा कॉलेज असणार आहे. ही स्पर्धा राष्ट्रीय स्तरावरची असून या स्पर्धेला देशातील विविध राज्यातून नामवंत स्पर्धक, आमंत्रित मान्यवर व महत्त्वाच्या व्यक्ती यांची उपस्थिती असणार असून राष्ट्रीय स्तरीय वसई-विरार महानगरपालिका मॅरेथॉन स्पर्धेच्या वेळी सकाळी ५-३० ते दुपारी १-०० पर्यंत शहरातील वाहनांमुळे वाहतूक कोंडी होऊन स्पर्धकांना अडथळा निर्माण होऊ नये याकरिता वरील स्पर्धा मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रतिबंध घालून व नियमानुसार आवश्यक त्या उपाययोजना होणे कामी महानगरपालिका प्रशासनाकडून विनंतीपत्र प्राप्त झाले आहे.

त्याअर्थी, मी, प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३३ (१) (ब) प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी करीत आहे :—

(१) **पूर्ण मॅरेथॉन (४२.१९५ कि.मी.)—**

पूर्ण मॅरेथॉन (४२.१९५ कि.मी.) स्पर्धा ही नवीन विवा कॉलेज येथून सुरू होऊन तिरूपतीनगर-जकात नाका-म्हाडा रोड वरील नवीन मनपा चौक येथून यु टर्न-जकात नाका-बोळींत नाका-पाटील आळी-उमराळे चर्च-चक्रेश्वर तलाव-हेडगेवार चौक-समेळ पाडा-नालासोपारा रेल्वे ब्रीजवरून पूर्वकडे-आचोळे रोड-बँक ऑफ इंडीया-वसंतनगरी ग्राउंड- वसंत नगरी सर्कल-वसई स्टेशन रोड वसई ओव्हर ब्रीजवरून पश्चिमेकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (पंचवटी नाका)-अंबाडी रोड - माणिकपूर नाका - वसई माणिकपूर रोड - बाभोळा नाका - पापडी नाका-तामतलाव नाका - चिमाजी आप्पा मैदान - जी. जी. कॉलेज - व्हिक्टर हाईटस् - पंचायत समिती रोड - पारनाका-बस डेपो मार्गे-चिमाजी आप्पा मैदान - तामतलाव नाका - पापडी नाका- बाभोळा नाका - माणिकपूर नाका - अंबाडी रोड - डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (पंचवटी नाका) - वसई ओव्हर ब्रीजवरून पूर्वेकडे-वसंतनगरी मेनगेट - वसंत नगरी सर्कल- वसंत नगरी ग्राउंड-फायर ब्रीगेड स्टेशन - बँक ऑफ इंडीया - आचोळे रोड (पूर्व) - नालासोपारा रेल्वे ब्रीजवरून पश्चिमेकडे - समेळ पाडा - हेडगेवार चौक - चक्रेश्वर तलाव-उमराळे चर्च - पाटील आळी - बोळींज नाका - गोकुळ टाऊनशीप-मुलजीभाई मेहता स्कूल - राजीव चौकातून उजवीकडे - विजय वल्लभ हॉस्पीटल-तिरूपती नगर - नवीन विवा कॉलेज-पर्यंत असा असणार आहे.

(२) **अर्ध मॅरेथॉन (२१ कि.मी.)—**

अर्ध मॅरेथॉन (२१ कि.मी.) स्पर्धा हा रूट व्हिक्टर हाईटस् परिसर- पंचायत समिती रोड - पारनाका - वसई बस डेपो मार्ग - तामतलाव नाका- पापडी नाका - वसई स्टेशन रोड - बाभोळा नाका- वसई माणिकपूर रोड - माणिकपूर नाका - नवघर अंबाडी रोड पोलीस चौकी - अंबाडी रोड- डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (पंचवटी नाका) - वसई ओव्हर ब्रीजवरून पूर्वेकडे - वसंत नगरी मेनगेट - वसंत नगरी सर्कल - वसंत नगरी ग्राउंड-फायर ब्रीगेड स्टेशन- बँक ऑफ इंडीया - आचोळे रोड (पूर्व) - नालासोपारा रेल्वे ब्रीजवरून पश्चिमेकडे-समेळ पाडा - हेडगेवार चौक - चक्रेश्वर तलाव - उमराळे चर्च - पाटील आळी - बोळींज नाका- गोकुळ टाऊनशीप - मुलजीभाई मेहता स्कूल-राजीव चौकातून उजवीकडे - विजय वल्लभ हॉस्पीटल - तिरूपती नगर-नवीन विवा कॉलेज पर्यंत असा असणार आहे.

(३) **११ कि.मी. स्पर्धा—**

११ कि.मी. स्पर्धा ही रूट नवीन विवा कॉलेज येथून सुरू होऊन तिरूपती नगर- जकात नाका- बोळींज नाका- पाटील आळी - उमराळे चर्च चक्रेश्वर तलाव येथून यु टर्न - उमराळे चर्च- पाटील आळी - बोळींज नाका - गोकुळ टाऊ नशीप - मुलजीभाई मेहता स्कूल-राजीव चौकातून उजवीकडे - विजय वल्लभ हॉस्पीटल - तिरूपती नगर - नवीन विवा कॉलेज पर्यंत असा असणार आहे.

(४) **५ कि.मी. स्पर्धा—**

५ कि.मी. स्पर्धा ही रूट नवीन विवा कॉलेज येथून सुरू होऊन तिरूपती नगर- जकातनाका- बोळींज नाका (द्वारका स्वीट) येथून यु टर्न- गोकुळ टाऊनशीप - मुलजीभाई मेहता स्कूल- राजीव चौकातून उजवीकडे - विजय वल्लभ हॉस्पीटल - तिरूपती नगर - नवीन विवा कॉलेज पर्यंत असा असणार आहे.

**पालघर जिल्हा मर्यादित व शालेय गटातील स्पर्धा**

(१) **११ कि.मी. स्पर्धा (पालघर जिल्हा मर्यादित)—**

११ कि.मी. स्पर्धा (पालघर जिल्हा मर्यादीत) याचा रूट नवीन विवा कॉलेज येथून सुरू होऊन तिरूपतीनगर - जकात नाका - बोळींज नाका - पाटील आळी- उमराळे चर्च - चक्रेश्वर तलाव येथून यु-टर्न - उमराळे चर्च- पाटील आळी - बोळींज नाका - गोकुळ टाऊनशीप-मुलजीभाई मेहता स्कूल-राजीव चौकातून उजवीकडे-विजय वल्लभ हॉस्पीटल - तिरूपती नगर - नवीन विवा कॉलेज पर्यंत असा असणार आहे.

(२) **७ कि.मी. (पालघर जिल्हा मर्यादित)—**

७ कि.मी. शालेय स्पर्धा याचा रूट नवीन विवा कॉलेज येथून सुरू होऊन महिपाल मेडीकल - विजय वल्लभ हॉस्पीटल (तिरूपती नगर)- बंजारा हॉटेल - कॅनरा बँक-जुने विवा कॉलेज रोड - मॅक्डोनल्डस् - कॉसमॉस बँकेपासून उजवीकडे वळून समोरील सर्कलवरून डावीकडे टर्न - फॅन्टसी केक शॉपपासून डावीकडे - अव्हेन्यु आय समोरून जे.एन.बी. ट्रेडर्स पासून उजवीकडे - सिद्धिविनायक मंदिर - रूस्तमजी स्कूल - नारंगी बिट चौकी पासून यु टर्न - रूस्तमजी स्कूल- सिद्धिविनायक मंदिर - जेएनबी ट्रेडर्स पासून डावीकडे - फॅन्टसी केक - कॉसमॉस बँक-मॅक्डोनल्डस् मनी गोपाळ बिल्डींगसमोरील बधाई स्वीट चौक पर्यंत असा असणार आहे.

(३) **५ कि.मी. (शालेय स्पर्धा)—**

७ कि.मी. शालेय स्पर्धा याचा रूट नवीन विवा कॉलेज येथून सुरू होऊन महिपाल मेडीकल - विजय वल्लभ हॉस्पीटल (तिरूपती नगर) - बंजारा हॉटेल - कॅनरा बँक-जुने विवा कॉलेज रोड - मॅक्डोनल्डस्-कॉसमॉस बँकेपासून उजवीकडे वळून समोरील सर्कलवरून डावीकडे टर्न - फॅन्टसी केक शॉपपासून यु टर्न - कॉसमॉस बँक - मॅक्डोनल्डस् - आगरी चौक - मनी गोपाळ बिल्डींगसमोरील बधाई स्वीट चौक पर्यंत असा असणार आहे.

(४) **३ कि.मी. (शालेय स्पर्धा)—**

७ कि.मी. शालेय स्पर्धा याचा रूट नवीन विवा कॉलेज येथून सुरू होऊन महिपाल मेडीकल - विजय वल्लभ हॉस्पीटल (तिरूपती नगर) - बंजारा हॉटेल-कॅनरा बँक - जुने विवा कॉलेज रोड - मॅक्डोनल्डस् पासून यु टर्न - आगरी चौक - मनी गोपाळ बिल्डींगसमोरील बधाई स्वीट चौक-पर्यंत असा असणार आहे.

(५) **२ कि.मी. (शालेय स्पर्धा)—**

७ कि.मी. शालेय स्पर्धा याचा रूट नवीन विवा कॉलेज येथून सुरू होऊन महिपाल मेडीकल - विजय वल्लभ हॉस्पीटल (तिरूपती नगर) - बंजारा हॉटेल-कॅनरा बँक - जुने विवा कॉलेज रोड - हॉटल हवेली पासून यु टर्न-मनी गोपाळ बिल्डींगसमोरील बधाई स्वीट चौक पर्यंत असा असणार आहे.

उपरोक्त नमूद मॅरेथॉन स्पर्धेच्या सर्व मार्गावर दिनांक ११ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ५-३० वा. ते १३-०० वाजेपावेतो सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे. वाहनचालक आणि नागरिकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी बंद मार्गाचे नजिकचे पर्यायी मार्गाचा वापर करून सहकार्य करावे.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना ही फायरब्रीगेड, रुग्णवाहिका, इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने, महसूल विभाग, पोलीस विभाग, तालुका दंडाधिकारी, वसई-विरार महानगरपालिकेची वाहने, मॅरेथॉन स्पर्धेकरिता परवानगी दिलेली वाहने यांना वगळून इतर सर्व वाहनांना लागू राहणार नाही.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना दिनांक ११ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ५-३० वा. ते १३-०० वाजेपर्यंत अंमलात राहील.

**प्रकाश गायकवाड,**
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय,
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय.

मिरा-भाईंदर, वसई-विरार,
दिनांक ३० नोव्हेंबर २०२२.

## उप निबंधक, सहकारी संस्था, वसई यांजकडून

### अंतरिम आदेश

क्रमांक उपनि/वसई/बी-१/लक्ष्मीछाया हौ/कलम १९/११/ सन २०२२.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १९ व नियम १८ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, मी, योगेश रं. देसाई, उप निबंधक, सहकारी संस्था, वसई लक्ष्मी छाया को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., ए-६, ब्लॉसम कॉम्प्लेक्स, शिर्डी नगर, गालानगर, आचोळे, नालासोपारा (पू.), ता. वसई, जि.पालघर या संस्थेची पुनर्रचना करून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७अ मधील तरतुदीनुसार संस्थेचे व्यवस्थापन पाहण्यासाठी श्री. अनिलकुमार आर. शुक्ला यांच्या अध्यक्षतेखाली श्री. बाबुसाहेब झा व श्री. चंद्रीकाप्रसाद पाठक यांचे त्रिसदस्यीय प्राधिकृत अधिकारी मंडळ नियुक्त करीत आहे.

सदर आदेश आज दिनांक १ नोव्हेंबर २०२२ रोजी माझे स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रेसह दिला आहे.

**योगेश रं. देसाई,**
उप निबंधक,
सहकारी संस्था, वसई.

## भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ यांजकडून

### अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक भूसंपादन / मसुरे (आंगणेवाडी)/०२-२०२१ /२०२२.— ज्याअर्थी " भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ " ( २०१३ चा ३०) याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक भूसंपादन / मसुरे (आंगणेवाडी) / ०२-२०२१ / २०२२, दिनांक २३ मार्च २०२२ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये अहवाल देणेचा प्रश्न उद्‌भवलेला नाही, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटुंबीयाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ यांस पदनिर्देशित केलेले आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडील पत्र क्रमांक / मशा / भूसं. सम/ कलम १९(१) अधि.सू.प्र./ १२ / २०२२, दिनांक ५ डिसेंबर २०२२ अन्वये भूसंपादन प्रकरणातील कलम १९ (१) नुसार अधिसूचना प्रसिद्ध करणेबाबतची कार्यवाही भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी पूर्ण करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

### अनुसूची- एक

### संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

गाव - देऊळवाडा तालुका - मालवण जिल्हा - सिंधुदुर्ग

| अ.क्र. | सर्व्हेनंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र ( हेक्टर आर मध्ये ) |
|---|---|---|---|
| १ | २२ | ० पै | ०.८००० |
| २ | २४ | ० पै | ०.४८५० |
| ३ | २५ | १अ | ०.०२०० |
| ४ | २५ | १ब+२क | ०.०१३० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | २५ | २अ | ०.०२०० |
| ६ | २५ | २ब+३ | ०.०३३० |
| ७ | २५ | ४ | ०.०४५० |
| ८ | २५ | ५+६ब | ०.०४०० |
| ९ | २५ | ६अ+११क | ०.०१०० |
| १० | २५ | ६क+१२ब | ०.०१३० |
| ११ | २५ | १०ब+११ब | ०.०१०० |
| १२ | २५ | ११अ+१२क+१०क+४३ | ०.०३८० |
| १३ | २५ | १२अ | ०.०१३० |
| १४ | २५ | ७+८अ | ०.०२१० |
| १५ | २५ | ८ब+९अ | ०.०७१० |
| १६ | २५ | ९ब | ०.१२२० |
| १७ | २५ | ९क | ०.०२८० |
| १८ | २५ | १०अ | ०.०२८० |
| १९ | २५ | १३ | ०.०१८० |
| २० | २५ | १४ | ०.०१३० |
| २१ | २५ | १५ | ०.०१३० |
| २२ | २५ | १६ | ०.००८० |
| २३ | २५ | १७ | ०.००५० |
| २४ | २५ | १८ | ०.००५० |
| २५ | २५ | १९ | ०.००५० |
| २६ | २५ | २० | ०.०२८० |
| २७ | २५ | २१ | ०.०४५० |
| २८ | २५ | २२ | ०.०५३० |
| २९ | २५ | २३ | ०.०४५० |
| ३० | २५ | २४ | ०.०५३० |
| ३१ | २५ | २५ | ०.०६८० |
| ३२ | २५ | २६ | ०.०३८० |
| ३३ | २५ | २७ | ०.०३०० |
| ३४ | २५ | २८ | ०.०३०० |
| ३५ | २५ | २९ | ०.०२३० |
| ३६ | २५ | ३० | ०.००५० |
| ३७ | २५ | ३१ | ०.००५० |
| ३८ | २५ | ३२ | ०.००५० |
| ३९ | २५ | ३३ | ०.०१५० |
| ४० | २५ | ३४ | ०.०२३० |
| ४१ | २५ | ३५ | ०.०२५० |
| ४२ | २५ | ३६ | ०.०४३० |
| ४३ | २५ | ३७ | ०.०७०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४४ | २५ | ३८ | ०.०३०० |
| ४५ | २५ | ३९ | ०.०२०० |
| ४६ | २५ | ४० | ०.०१५० |
| ४७ | २५ | ४१ | ०.०४०० |
| ४८ | २५ | ४२ | ०.०२०० |
| ४९ | २५ | ४४ | ०.२००० |
| ५० | २५ | ४५ | ०.०२५० |
| ५१ | २५ | ४६/१ | ०.०६८० |
| ५२ | २५ | ४६/२ | ०.०५८० |
| ५३ | २५ | ४६/३ | ०.०५१० |
| ५४ | २५ | ४६/४ | ०.१२१० |
| ५५ | २५ | ४६/५ | ०.३६५० |
| ५६ | २५ | ४६/६ | ०.०४०० |
| ५७ | २५ | ४६/७ | ०.०६०० |
| ५८ | २५ | ४६/८ | ०.०६८० |
| ५९ | २५ | ४६/९ | ०.०४०० |
| ६० | २५ | ४६/१० | ०.०२०० |
| ६१ | २५ | ४६/११ | ०.०४०० |
| ६२ | २५ | ४६/१२ | ०.०२०० |
| ६३ | २५ | ४६/१३ | ०.०१५० |
| ६४ | २५ | ४६/१४ | ०.०५०० |
| ६५ | २५ | ४६/१५ | ०.०४०० |
| ६६ | २५ | ४६/१६ | ०.०३०० |
| ६७ | २६ | १+२ब+३/७+४ब+२१क | ०.०६१० |
| ६८ | २६ | २अ+२१अ | ०.०१०० |
| ६९ | २६ | २१ब | ०.००५० |
| ७० | २६ | ३/१+६/२+७/१ | ०.०१८० |
| ७१ | २६ | ३/२+७/२ | ०.०१५० |
| ७२ | २६ | ३/३+७/२ | ०.०१३० |
| ७३ | २६ | ३/४+७/४+६/३ | ०.०२८० |
| ७४ | २६ | ३/५+७/५+६/४ | ०.०१८० |
| ७५ | २६ | ७/६+६/५ | ०.०१८० |
| ७६ | २६ | ७/७+६/६ | ०.०१०० |
| ७७ | २६ | ६/१+५+८क | ०.११६० |
| ७८ | २६ | ८/ब | ०.१५१० |
| ७९ | २६ | ८अ+९+१०/२ब | ०.०६६० |
| ८० | २६ | १३/७ | ०.०१५० |
| ८१ | २६ | १०/१+१०/२अ+१०/३ | ०.०४५० |
| ८२ | २६ | १३/१ | ०.०१०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ८३ | २६ | १३/२+१२/३ | ०.००५० |
| ८४ | २६ | १३/३+१२/४ | ०.००५० |
| ८५ | २६ | १३/४+१२/५ | ०.००८० |
| ८६ | २६ | १३/५+१२/६ | ०.०१०० |
| ८७ | २६ | १३/६ | ०.००८० |
| ८८ | २६ | ११अ+१२/१+२०ड | ०.०३०० |
| ८९ | २६ | ११ब+१२/२ | ०.०४३० |
| ९० | २६ | १४ब | ०.१०१० |
| ९१ | २६ | १५ब+१६ | ०.१०४० |
| ९२ | २६ | १४अ+२०ब+१५ | ०.११९० |
| ९३ | २६ | ३/६+४अ | ०.०१५० |
| ९४ | २७ | १ | ०.१६०० |
| ९५ | २७ | २अ | ०.३८०० |
| ९६ | २७ | २ब | ०.०६०० |
| ९७ | २७ | २क | ०.०९०० |
| ९८ | २७ | २ड | ०.०८०० |
| ९९ | २७ | ५/८+४ब+३ब | ०.०५०० |
| १०० | २७ | ५/७+४अ+३अ | ०.२६०० |
| १०१ | २७ | ५/६+४क | ०.०६०० |
| १०२ | २७ | ५/५ | ०.०५०० |
| १०३ | २७ | ५/४ | ०.०३०० |
| १०४ | २७ | ५/३ | ०.०२०० |
| १०५ | २७ | ५/२ | ०.०४०० |
| १०६ | २७ | ५/१+६ब | ०.०५०० |
| १०७ | २७ | ६अ+५/९ | ०.१६०० |
| १०८ | २७ | ७ पै | ०.०२३७ |
| १०९ | २८ | १/३ पै | ०.१४५० |
| ११० | २८ | १/५ | ०.१९५० |
| १११ | २८ | १/६ | ०.०२०० |
| ११२ | ३४ | १/२७ पै | ०.०२३७ |
| ११३ | ३४ | १/२८ पै | ०.०१६२ |
| ११४ | ३४ | १/२९ | ०.०३०० |
| ११५ | ३४ | १/३० | ०.०८०० |
| ११६ | ३४ | १/३१ पै | ०.०७०० |
| ११७ | ३४ | २ पै | ०.०९८७ |
| ११८ | ३४ | ३ | ०.५७०० |
| ११९ | ३४ | ४ पै | ०.२५२० |
| १२० | ३४ | ५ | ०.१६०० |
| १२१ | ३४ | ६ | ०.१२०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १२२ | ३४ | ७ पै | ०.३३३० |
| १२३ | ३४ | ८ पै | ०.१९१६ |
| १२४ | ३४ | ९ पै | ०.३७१० |
| १२५ | ३४ | १० | ०.०३०० |
| १२६ | ३४ | ११ | ०.०५०० |
| १२७ | ३४ | १२ पै | ०.२१५० |
| १२८ | ३४ | १३ पै | ०.५२४५ |
| | | **एकूण** | **१०.०७३४** |

**अनुसूची - दोन**

**प्रकल्पाचे नाव** :- लघु पाटबंधारे योजना मसुरे ( आंगणेवाडी ), ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग

**प्रकल्प कार्याचे वर्ष** :- २०२१

**समाजाला मिळणारे लाभ** :- पायाभूत सुविधा ( सिंचन क्षेत्रात वाढ व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता), सदर लघुपाटबंधारे प्रकल्प हा सिंचन प्रकल्प असून या प्रकल्पामुळे मौजे देऊळवाडा, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग येथील ८० हेक्टर शेतजमिन सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे हित साध्य होणार आहे. तसेच प्रकल्पामुळे पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे.

**अनुसूची - तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

बाधित व्यक्तींचे विस्थापन होत नाही.

**अनुसूची - चार**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजना लागू होत नाही.

**टीप.—** उक्त जमिनीचे आराखडे भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ, जि. सिंधुदुर्ग यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत निरीक्षण करता येतील.

**आविशकुमार सोनोने,**
भूसंपादन अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ.

कुडाळ,
दिनांक ७ डिसेंबर २०२२.

## उप संचालक भूमि अभिलेख कोंकण प्रदेश मुंबई यांजकडून

**वाचा.—** (१) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र. आस्थापना १०९३/प्र.क्र.१९/ल-१, दिनांक १८/८/१९९४.

(२) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. एस. व्ही. सी. आर-४३२०/स-४/९४, दिनांक २२/९/१९९४.

(३) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गांवठाण/ परिपत्रक/ का.वि. ६०७/प्र.क्र.०१/२०२२ पुणे, दिनांक १०/०१/२०२२.

(४) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांचेकडील पत्र क्र.शि.दा./कोलशेत/परिरक्षण प्रस्ताव/२०२२/२८६१, ठाणे, दिनांक २८/१०/२०२२.

### अधिसूचना

क्र. ना. भू. २/गांवठाण / अधिसूचना/ २०२२/४२८०.— महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक आस्थापना १०९३/प्र.क्र.१९/ल-१, दिनांक १८ ऑगस्ट १९९४ अन्वये भूमि अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, (म. राज्य). पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. एस. व्ही. सी. आर-४३२०/स-४/ ९४, दिनांक २२ सप्टेंबर १९९४ अन्वये कोंकण विभागातील सजांची पुनर्रचना करणेत आली आहे. तसेच पारंपरिक पद्धतीने नगर भूमापन झालेली गावे परिरक्षणासाठी घेण्याचे अधिसूचना मंजुरीचे अधिकार मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांनी त्यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण/परिपत्रक/का.वि. ६०७/प्र.क्र.०१/२०२२, दिनांक १० जानेवारी २०२२ अन्वये उप संचालक, भूमि अभिलेख (प्रादेशिक प्रमुख) यांना दिलेले आहेत.

जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, ठाणे यांनी त्यांचेकडील प्रस्तावामध्ये मौजे-कोलशेत हे १३११ मिळकतींचे गांव परिनिरीक्षणासाठी परिरक्षण भूमापक कासारवडवली यांचेकडील सजामध्ये नव्याने समाविष्ट करणेबाबत प्रस्तावित केले आहे.

त्यानूसार सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे सजा कासारवडवलीमध्ये मौजे-कोलशेतमधील १३११ मिळकती नव्याने नगर भूमापन अधिकारी, ठाणे यांचे कार्यक्षेत्रामधील नगर भूमापन हद्दीमध्ये समाविष्ट करून त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येऊन परिरक्षणास घेणेस एतद्वारे मंजुरी देणेत येत आहे. तसेच सनद फी रुपये १९,५१,२२०/- वसूल करावी. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक ११ नोव्हेंबर २०२२ पासून होणेची आहे.

**जयंत निकम,**
उप संचालक, भूमि अभिलेख,
कोंकण प्रदेश, मुंबई.

## परिशिष्ट

### नगर भूमापन योजने अंतर्गत नव्याने परिरक्षणासाठी घेण्यात येणाऱ्या गावांचा/मिळकतींचा तपशील

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | कार्यालयाचे नाव | सध्या परिरक्षणासाठी उपलब्ध (पुनर्रचनेपूर्वी) | | | परिरक्षणास नव्याने घ्यावयाचे गाव | | पुनर्रचने नंतरची स्थिती | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सजा | गावे | मिळक-ती | गावे | मिळकती | सजा | गावे | मिळकती | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | ठाणे | ठाणे | नगर भूमापन अधिकारी ठाणे | कासार वडवली | कासारवडवली, कावेसर, कोलशेत पैकी, चितळसर मानपाडा, माजिवडा,ढोकाळी | ७४१८ | कोलशेत पैकी | १३११ | कासार वडवली | कासारवडवली, कावेसर, कोलशेत पैकी, चितळसर मानपाडा, माजिवडा,ढोकाळी | ७४१८ | सदर सजाचे काम नगर भूमापन अधिकारी ठाणे यांचेकडील परिरक्षण भूमापक कासारवडवली यांचेकडून करून घेणेचे आहे. |
| २ | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | -- | -- | | | | कोलशेत पैकी | १३११ | |
| | | | | | एकूण | ७४१८ | | | | एकूण | ८७२९ | |

मुंबई,
दिनांक ११ नोव्हेंबर २०२२.

**अमर ढोकले,**
कार्यालय अधीक्षक,
उप संचालक, भूमि अभिलेख,
कोंकण प्रदेश, मुंबई.

## उप संचालक, भूमि अभिलेख, कोंकण प्रदेश, मुंबई यांजकडून

**वाचा.—** (१) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र. आस्थापना १०९३/प्र.क्र.१९/ल-१, दि.१८/८/१९९४.

(२) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. एस. व्ही.सी. आर- ४३२०/स-४/९४, दिनांक २२/९/१९९४.

(३) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाणा/ परिपत्रक/का.वि. ६०७/प्र.क्र.०१/२०२२ पुणे, दिनांक १०/०१/२०२२.

(४) जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, ठाणे यांचेकडील पत्र क्र. शि. दा./ओवळे/परिरक्षण प्रस्ताव/२०२२/२७९५ ठाणे, दिनांक २०/१०/२०२२.

### अधिसूचना

क्रमांक ना. भू. २/गांवठाण/अधिसूचना/ २०२२/४२८२.— महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक आस्थापना १०९३/प्र.क्र.१९/ल-१, दिनांक १८ ऑगस्ट १९९४ अन्वये भूमि अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, (म.राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. एस. व्ही. सी. आर-४३२०/स-४/९४, दिनांक २२ सप्टेंबर १९९४ अन्वये कोंकण विभागातील सजांची पुनर्रचना करणेत आली आहे. तसेच पारंपरिक पद्धतीने नगर भूमापन झालेली गावे परिरक्षणासाठी घेण्याचे अधिसूचना मंजुरीचे अधिकार मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांनी त्यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण/परिपत्रक/का.वि. ६०७/प्र.क्र.०१/२०२२, दिनांक १० जानेवारी २०२२ अन्वये उप संचालक, भूमि अभिलेख (प्रादेशिक प्रमुख) यांना दिलेले आहेत.

जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, ठाणे यांनी त्यांचेकडील प्रस्तावामध्ये मौजे-ओवळे हे. २३४ मिळकतींचे गांव परिनिरीक्षणासाठी परिरक्षण भूमापक ठाणे यांचेकडील सजामध्ये नव्याने समाविष्ट करणेबाबत प्रस्तावित केले आहे.

त्यानुसार सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे सजा ठाणेमध्ये मौजे-ओवळेमधील २३४ मिळकती नव्याने नगर भूमापन अधिकारी, ठाणे यांचे कार्यक्षेत्रामधील नगर भूमापन हद्दीमध्ये समाविष्ट करून त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येऊन परिरक्षणास घेणेस एतद्वारे मंजुरी देणेत येत आहे. तसेच सनद फी रुपये ४,१३,०४०/- वसूल करावी. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक ११ नोव्हेंबर २०२२ पासून होणेची आहे.

**जयंत निकम,**
उप संचालक, भूमि अभिलेख,
कोंकण प्रदेश, मुंबई.

## परिशिष्ट

### नगर भूमापन योजने अंतर्गत नव्याने परिरक्षणासाठी घेण्यात येणाऱ्या गावांचा/मिळकतींचा तपशील

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | कार्यालयाचे नांव | सध्या परिरक्षणासाठी उपलब्ध (पुनर्रचनेपूर्वी) | | | परिरक्षणास नव्याने घ्यावयाचे गाव | | पुनर्रचने नंतरची स्थिती | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सजा | गावे | मिळकती | गावे | मिळकती | सजा | गावे | मिळकती | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | ठाणे | ठाणे | नगर भूमापन अधिकारी ठाणे | ठाणे | भाईंदरपाडा, येऊर, ओवळे | १६५० | ओवळे पैकी | २३४ | ठाणे | भाईंदरपाडा, येऊर, ओवळे | १६५० | सदर सजाचे काम नगर भूमापन अधिकारी ठाणे यांचेकडील परिरक्षण भूमापक ठाणे यांचेकडून करून घेणेचे आहे. |
| २ | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | -- | -- | | | | ओवळे पैकी | २३४ | |
| | | | | | एकूण | १६५० | | | | एकूण | १८८४ | |

मुंबई,
दिनांक ११ नोव्हेंबर २०२२.

**अमर ढोकले,**
कार्यालय अधीक्षक,
उप संचालक, भूमि अभिलेख,
कोंकण प्रदेश, मुंबई.

## उप संचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांजकडून

**वाचा.—** (१) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र. आस्थापना १०९३/प्र.क्र.१९/ल-१, दि. १८/८/१९९४.

(२) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. एस. व्ही.सी. आर-४३२०/स-४/९४, दिनांक २२/९/१९९४.

(३) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण/परिपत्रक/का.वि. ६०७/प्र.क्र.०१/२०२२ पुणे, दिनांक १०/०१/२०२२.

(४) जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, ठाणे यांचेकडील पत्र क्र. शि. दा./ढोकाळी/परिरक्षण प्रस्ताव/२०२२/२७९६, ठाणे, दिनांक २०/१०/२०२२.

### अधिसूचना

क्रमांक ना. भू. २/गांवठाण/अधिसूचना/ २०२२/४२८१.— महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक आस्थापना १०९३/प्र.क्र.१९/ल-१, दिनांक १८/८/१९९४ अन्वये भूमि अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, (म.राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. एस. व्ही. सी. आर-४३२०/स-४/९४, दिनांक २२ सप्टेंबर १९९४ अन्वये कोंकण विभागातील सजांची पुनर्रचना करणेत आली आहे. तसेच पारंपरिक पद्धतीने नगर भूमापन झालेली गावे परिरक्षणासाठी घेण्याचे अधिसूचना मंजुरीचे अधिकार मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांनी त्यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण/परिपत्रक/का.वि. ६०७/प्र.क्र.०१/२०२२, दिनांक १० जानेवारी २०२२ अन्वये उप संचालक, भूमि अभिलेख (प्रादेशिक प्रमुख) यांना दिलेले आहेत.

जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, ठाणे यांनी त्यांचेकडील प्रस्तावामध्ये मौजे-ढोकाळी हे ५७३ मिळकतींचे गाव परिनिरीक्षणासाठी परिरक्षण भूमापक, कासारवडवली यांचेकडील सजामध्ये नव्याने समाविष्ट करणेबाबत प्रस्तावित केले आहे.

त्यानुसार सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे सजा, कासारवडवलीमध्ये मौजे-ढोकाळीमधील ५७३ मिळकती नव्याने नगर भूमापन अधिकारी, ठाणे यांचे कार्यक्षेत्रामधील नगर भूमापन हद्दीमध्ये समाविष्ट करून त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येऊन परिरक्षणास घेणेस एतद्वारे मंजुरी देणेत येत आहे. तसेच सनद फी रुपये ७,२४,३२० वसूल करावी. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक ११ नोव्हेंबर २०२२ पासून होणेची आहे.

**जयंत निकम,**
उप संचालक, भूमि अभिलेख,
कोंकण प्रदेश, मुंबई.

## परिशिष्ट

### नगर भूमापन योजने अंतर्गत नव्याने परिरक्षणासाठी घेण्यात येणाऱ्या गावांचा/मिळकतींचा तपशील

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | कार्यालयाचे नांव | सध्या परिरक्षणासाठी उपलब्ध (पुनर्रचनेपूर्वी) | | | परिरक्षणास नव्याने घ्यावयाचे गाव | | पुनर्रचने नंतरची स्थिती | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सजा | गावे | मिळकती | गावे | मिळकती | सजा | गावे | मिळकती | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | ठाणे | ठाणे | नगर भूमापन अधिकारी, ठाणे | कासार वडवली | कासारवडवली, कावेसर, कोलशेत, चितळसर मानपाडा, माजिवडा | ६८४५ | ढोकाळी | ५७३ | कासार वडवली | कासारवडवली, कावेसर, कोलशेत, चितळसर मानपाडा, माजिवडा | ६८४५ | सदर सजाचे काम नगर भूमापन अधिकारी ठाणे यांचेकडील परिरक्षण भूमापक कासारवडवली यांचेकडून करून घेणेचे आहे. |
| २ | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | -- | -- | | | | ढोकाळी | ५७३ | |
| | | | | | एकूण | ६८४५ | | | | एकूण | ७४१८ | |

मुंबई,
दिनांक ११ नोव्हेंबर २०२२.

**अमर ढोकले,**
कार्यालय अधीक्षक,
उप संचालक, भूमि अभिलेख,
कोंकण प्रदेश, मुंबई.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.